असा. क्र. ११५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-[illegible]/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

मंगळवार, ऑक्टोबर १३, १९९८/आश्विन २१, शके १९२०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ ऑक्टोबर १९९८

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही. १४९६/प्र. क्र. ४७०/ई-७.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि यासंबंधात करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील नायब तहसीलदार, महाराष्ट्र नागरी सेवा–गट ब या पदांच्या सेवाप्रवेशांचे नियमन करणारे पुढील नियम तयार करीत आहेत ते असे :—

१. या नियमास नायब तहसीलदार—गट ब (सेवाप्रवेश) नियम, १९९८ असे म्हणता येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या नियमांमध्ये,—

(अ) "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ब) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

३. नायब तहसीलदारांचा संवर्ग हा विभागीय संवर्ग असेल व त्या संवर्गात नेमणू झालेल्या व्यक्तींची महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही ठिकाणी नियुक्ती (Postin बदली किंवा प्रतिनियुक्ती करता येईल ;

४. नायब तहसीलदार पदावरील नियुक्ती पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे म्हणजेच,-

(१) महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामध्ये अव्वल कारकून अथवा मंड अधिकारी हे पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गामध्ये तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इत नियमित सेवा झालेल्या महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंड अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) अन्वये एखाद विभागीय मंडळाकडून घेतली जाणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेल किंवा राज्य शासनाने तिच्याशी समतुल्य म्हणून जाहीर केलेली कोणतीही परीक्षा उत्ती झालेल्या व्यक्तींमधून पात्रतेनुसार, ज्येष्ठताक्रमांच्या आधारे योग्य व्यक्तीस पदोन्नती देउ करण्यात येईल.

तथापि, अव्वल कारकून व मंडळ अधिकारी या संवर्गातील व्यक्तींना कोणत्या प्रमाणा पदोन्नती द्यावयाची हे संबंधित संवर्गातील कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेतल्यानंत शासनाकडून प्रत्येक विभागासाठी कार्यकारी आदेशाद्वारे विहित करण्यांत येईल; किंवा,

(२) आयोगाने घेतलेल्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकालांच्या आधारे, ज्या उमेदवारां

(अ) वय १९ वर्षांहून कमी अथवा ३० वर्षांहून जास्त नसेल,

(ब) ज्यांनी सांविधिक विद्यापीठाची पदवी अथवा शासनाने तिच्याशी समतुल म्हणून जाहीर केली असेल अशी अन्य कोणतीही पात्रता धारण केलेली असेल, आ

(क) ज्यांना मराठीचे पुरेसे ज्ञान असेल,

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

५. पदोन्नतीने व नामनिर्देशनाने या पदांवर नियुक्ती केलेल्यांचे प्रमाण ६७.३३ इत राहील.

परंतु, सेवेची निकड लक्षात घेऊन तसे करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत असे तेव्हा शासनास नामनिर्देशनाने भरती करण्यासाठी या नियमांमध्ये विहित केलेली टक्केवार शिथिल करून आयोगाशी विचारविनिमय केल्यानंतर नायब तहसीलदार-गट ब पदावरील नेमणुका करता येतील.

६. (१) नामनिर्देशनाद्वारे या पदावर नेमण्यात आलेली व्यक्ती दोन वर्षे मुदतीपर्यंत परिविक्षाधीन असेल व या परीविक्षा काळात त्या व्यक्तीला शासनाकडून याबाबतीत विहित करण्यात येईल असे प्रशिक्षण घ्यावे लागेल व अशी विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल

परंतु जी परिविक्षाधीन व्यक्ती, अशी परिक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा ज्या परि विक्षाधीन व्यक्तीने शासनाच्या दृष्टीने समाधानकारकरित्या परिविक्षा कालावधी पूर्ण केलेल नसेल अशा व्यक्तीचा परिविक्षा कालावधी एकूण एक वर्षापेक्षा अधिक नसेल अशा आणखी मुदतीपर्यंत शासनास वाढविता येईल.

(२) जो परिविक्षाधीन नायब तहसीलदार विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण झालेला नसेल, किंवा पोट-नियम (१) मध्ये विहित केलेला परिविक्षा कालावधी ज्यांनी पूर्ण करण्यात कसूर केलेली असेल त्याला सेवेतून कमी करण्यात येईल.

७. उक्त पदांवर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीने, त्या संबंधात करण्यात आलेल्या नियमांनुसार, हिंदी व मराठी भाषेतील परीक्षा, जर ती पूर्वीच उत्तीर्ण झालेली नसेल किंवा तिला अशा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नसेल तर, उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आर. एम. प्रेमकुमार,
शासनाचे प्रधान सचिव.